नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/१२/२०२५ (गुरूवार )**

## अल्पवयीन बालकाच्या मदतीने चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर :—** फिर्यादी नामे वसिम मुस्ताक शेख, वय ३२ वर्ष, रा. मुरलीधर मंदिर जवळ सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दिनांक ०२/१२/२०२५ ला फिर्यादीच्या मालकीचा जनता सेलीब्रेशन लॉन हा लग्न असल्याने किरायाने दिला होता. सायंकाळी ०६.०० वाजता पासुन १२.०० वाजेपर्यंत लग्नाचा सोहळा झाला त्या दरम्यान रात्री १०.०० वाजता दरम्यान एक मुलगा वय अंदाजे ०५ वर्ष हा लॉनच्या आत लग्नामध्ये आला त्याने जेवन करत असलेल्या लग्नातील एका महिलेचा पर्स चोरण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्या महिलेचे १५,०००/— रुपये तसेच इतर किंमती सामान होते. मुलाला विचारपुस केली असता त्याने बाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीच्या सांगण्यावरून पर्स चोरण्याचा प्रयत्न केल्याची माहीती प्राप्त झाली.

सदर घटनेची माहिति सावनेर पोलीसांना मिळताच सावनेर पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन सदर प्रकरणात अधिक चौकशी करून बालकाकडुन चोरी करवुन घेण्याचा प्रयत्न करणारा आरोपी नामे **जॅकी सिंग, वय ३५ वर्ष, गुलखेडी, पचोर राजगढ ,मध्यप्रदेश** याला ताब्यात घेवुन त्याचेवर कलम ३०५ (अ) , ६२ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०३/१२/२०२५ रोजी रामटेक पोलीसांनी अवैधरित्या दारू विक्री करणारा **आरोपी लक्ष्मण भुराजी ताकोत, वय ५२ वर्ष, रा. विनोबा भावे वार्ड, रामटेक, जि. नागपुर** याचेवर कारवाई करत नगर परीषद क्वाटर्स समोर, ता. रामटेक येथे छापा टाकुन त्याचे ताब्यातुन २० लिटर मोहाफुल दारू असा एकुण २,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने